महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६७ वा | दिनांक : ०७/१२/२०२४ | वार : शनिवार

# एकनाथ शिंदे मंत्रिपद देताना कठोर होणार



**मुंबई** : शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारासंबंधी अत्यंत कठोर भूमिका घेण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शिंदे यांनी आपल्या नेतृत्वातील सरकारमधील शिवसेनेच्या ज्येष्ठ मंत्र्यांचा पत्ता कापून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. असे झाले तर फडणवीस सरकारमध्ये अनेक नवे चेहरे दिसून येतील.

येत्या १६ डिसेंबरपासून नागपुरात राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरवात होणार आहे. तत्पूर्वी, मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मंत्र्यांच्या कामाचे मूल्यांकन करून मंत्रिपदाचा निर्णय घेण्याचे संकेत दिलेत. त्यानुसार उद्या महायुतीच्या तिन्ही प्रमुख पक्षांची बैठक होणार आहे. त्यात मंत्रिमंडळाच्या विस्तारावर विस्तृत चर्चा होणार आहे.

दुसरीकडे, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची आज बैठक झाली. त्यात ७ कॅबिनेट व ३ राज्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यांवर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. आता एकनाथ शिंदेही शिवसेनेची मंत्रिपदे देताना कठोर निकष लावणार असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे पक्ष संघटना वाढवण्यास हातभार लावणाऱ्या पात्र आमदारांनाच मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे. या प्रकरणी शिवसेना पक्ष संघटना वाढीसाठी योगदान काय? हा महत्त्वाचा निकष लावला जाणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे यावेळी ज्येष्ठतेच्या आधारावर कुणालाही मंत्रिपद मिळणार नाही. त्यामुळे दीपक केसरकर, अब्दुल सत्तार व तानाजी सावंत यांच्यासारख्या बड्या नेत्यांना देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये स्थान मिळणार नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शिवसेनेच्या संभाव्य मंत्र्यांची यादी

उदय सामंत शंभूराज देसाई गुलाबराव पाटील संजय शिरसाट भरत गोगावले प्रकाश सुर्वे प्रताप सरनाईक राजेश क्षीरसागर आशिष जैस्वाल नीलेश राणे

महायुतीच्या खातेवाटपात एकनाथ शिंदे यांनी गृहखात्यासाठी आग्रह धरला आहे. पण भाजपने त्यांची ही मागणी पूर्ण करण्यासाठी अद्याप कोमतेही सकारात्मक संकेत दिले नाहीत. देवेंद्र फडणवीस यासंबंधी बोलताना म्हणाले, महायुतीमधील तिन्ही पक्षांना आपल्याला अधिकाधिक मंत्रिपदे मिळावीत असे वाटते. विशेषतः एखादा पक्ष चालवायचा असतो तेव्हा नेत्यांना संतुष्ट करावे लागते. त्यामुळे आमची खातेवाटपावर चर्चा सुरू आहे. ही चर्चा संपण्याच्या मार्गावर असून, खातेवाटपही जवळपास निश्चित झाले आहे. सरकारमध्ये गृह व महसूल खात्याला थोडे जास्त महत्त्व असते. सध्या याविषयी कोणताही निर्णय झाला नाही. हा निर्णय होईल तेव्हा जाहीर केले जाईल.

## अंबादास दानवे यांनी पोस्ट केला शिंदेंचा अमित शहा, देवेंद्र फडणवीसांपुढे खांदे झुकलेला फोटो





**मुंबई** : एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी टोला लगावला आहे. शपथविधी झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. अंबादास दानवे यांनी या प्रसंगाचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत एकनाथ शिंदे यांना डिवचले. या फोटोला कॅप्शनची आवश्यकता नाही, असे लिहीत हा फोटो त्यांनी पोस्ट केला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे खुर्चीवर बसलेले आहेत. शपथ घेतल्यानंतर एकनाथ शिंदे त्यांच्या दिशेने मान खाली घालून उभे आहेत. तर जे. पी. नड्डा आणि अमित शहा हे शिंदेंना नमस्कार करत आहेत. राजनाथ सिंह तर शिंदेंकडे पाहत सुद्धा नाहीत. एकनाथ शिंदे दिल्लीश्वरांसमोर झुकले, असे अंबादास दानवे या फोटोवरून सांगत असावेत.

महायुती सरकारचा गुरुवारी शपथविधी पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ ग्रहण केली. मागील महायुती सरकारच्या काळात एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते. यावेळी त्यांनी भाजपकडे मुख्यमंत्री पदाची मागणी केली होती. परंतु, त्यांना संधी मिळाली नाही. यावरून एकनाथ शिंदे यांची कथित नाराजी दिसून आली. आता अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर फोटो पोस्ट करत एकनाथ शिंदे यांना डिवचल्याने राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.




## कंत्राटी नोकर भरती रद्द करा नाना पटोले यांचा इशारा



**नागपूर** : राज्यात अडीच लाखाहून अधिक सरकारी पदे रिक्त आहेत. विविध विभागातील मागासवर्गीय पदांचा अनुशेषही भरला नाही. बेरोजगारांची मोठी फौज राज्यात असून लाखो तरुण मुले-मुली नोकरीची अपेक्षेने वाट पहात असताना सरकारने पुन्हा एकदा कंत्राटी भरती सुरू करून सुशिक्षित तरुणांना नोकर भरतीच्या दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासला आहे.

काँग्रेसचा कंत्राटी नोकर भरतीला तीव्र विरोध असून ही भरती रद्द करा अन्यथा रस्त्यावर उतरू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी येथे माध्यमांशी बोलताना दिला आहे.

केंद्रात आणि राज्यातही महायुतीचे सरकार आहे.

आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करतो असे ते नेहमी सांगतात. मग सोयाबीन आणि कापुस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर का सोडले असा सवाल पटोले यांनी केला. महाराष्ट्राची परंपरा आहे. शपथविधीला आम्हाला बोलावले नाही. बोलावले असते तर गेलो असतो, असे नाना पटोले म्हणाले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले यासाठी शुभेच्छा आहे. त्यांनी महाराष्ट्र पुढे न्यावा. आता तरुणांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा आहे. आमचा मित्र महाराष्ट्रासाठी काम करेल, अशी अपेक्षा पटोले यांनी व्यक्त केली.

भाजपाचे लोक संविधाना पलीकडचे आहे. राज्यपालांचा अधिकार असताना पक्षाचे लोक शपथविधीची तारीख सांगतात. हे बरोबर झाले नाही. महायुतीच्या सरकारमध्ये कोणते चेहरे राहाणार यात कोणाला काही स्वारस्य नाही. येथे जनतेचे प्रश्न सुटले पाहिजे.

महाराष्ट्राची सुसाट प्रगती झाली पाहिजे. त्याऐवजी सुसाट वेगाने राज्य गुजरातकडे जावू नये, अशी टिका पटोलेंनी केली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ डिसेंबर २०२४

# शिवसेना नेते आमदार अब्दुल सत्तार यांची सलग चौथ्यांदा विधानसभेसाठी निवड

**सिल्लोड ( प्रतिनिधी )** दि.६, शिवसेना नेते आमदार अब्दुल सत्तार यांची सलग चौथ्यांदा विधानसभेसाठी निवड झाल्याबद्दल शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अब्दुल सत्तार यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुंबईच्या आझाद मैदानावर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजितदादा पवार यांचा शपथविधी सोहळा पार पडला.

त्यानंतर आज शुक्रवारी अभाग्यतांना भेटण्यासाठी मंत्री अब्दुल सत्तार त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात उपस्थित होते. यावेळी शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले. तसेच मतदारसंघातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, कृउबा समितीचे संचालक श्रीरंग साळवे, नंदकिशोर सहारे, विश्वास दाभाडे, जयराम चिंचपुरे, पप्पू राऊत, अजीजसेट बागवान, संजय डमाळे, दुर्गाबाई पवार, सुमनबाई तांगडे, विशाल जाधव, मुरलीधर काळे, राजूबाबा काळे, अब्दुल रहीम, पंकज जैस्वाल, शेख सलीम, अब्दुल करीम, सय्यद जब्बार, लक्ष्मण कल्याणकार, मोहसीन देशमुख, नाना पा. कळम ,नामदेव पांढरे, शेख मोहसीन, दीपक हावळे, अजगर झारेकर, स्वप्नील काकडे आदींची उपस्थिती होती.

# मुरूम येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन



**मुरूम, ता. उमरगा येथील आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालताना मान्यवर पदाधिकारी व अन्य.**

**मुरुम, ता. उमरगा, ता. ६ (प्रतिनिधी) :** येथील आंबेडकर चौकात महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलिस उपनिरिक्षक गव्हाणे, पशुधन अधिकारी देशमुख, दत्ता हुळमजगे, पत्रकार महेश निंबरगे, झुंबर बनसोडे, यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रविण गायकवाड, सतिश सावंत, भास्कर सूर्यवंशी, सतिश भालेराव, गौस शेख, बबनराव बनसोडे आदींची उपस्थिती होती. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विशाल गायकवाड, आनंद कांबळे, आशिष गवई, किरण गायकवाड, आशुतोष गायकवाड, अमर भालेराव, शुभम सावंत, समीर सोमवंशी, विवेक भालेराव, अमोल बनसोडे, सुरज कांबळे, भैय्या सुर्यवंशी आदींनी पुढाकार घेतला. सुत्रसंचालन अजिंक्य कांबळे तर आभार आकाश गवई यांनी मानले.




# कविता संविधानाची स्त्रियांच्या मुक्तीची....



**डॉ योगिता मंगेश कथले (देवगिरीकर)**
**८९७५२९१९४०**

भारताला एका छत्रात बांधून ठेवण्याचं केलं काम
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी
संविधानरूपी अमोल ठेवा दिला
लोकांच्या कल्याणासाठी

जात, धर्म, पंथ ना लिंगाला वाव
कायद्यासमोर सर्व एक समान
स्वातंत्र्य, बंधुता, न्याय समानता
राज्यकारभार हा लोकशाहीचा

स्त्रियास असता दुय्यम स्थान
बाबासाहेबांनी दिले त्यांना मौलिक अधिकार
घरगुती हिंसाचारात कायद्यानुसार भत्ता..
वडिलांच्या संपत्तीमध्ये दिला अधिकारी

हुंडाबळीसाठी ४९८ ए कायदा
नोकरीच्या ठिकाणी शोषण, लैंगिक छळ....
त्यांनी फिरवावा १०९० हा नंबर ...
समान वेतन हा अधिनियम बाबासाहेबांनी दिला घालून

लैंगिक भेदभाव केला समूळ नष्ट
मुला मुलीस दिला समान हक्क
गर्भपात कायद्याने गुन्हा
पाहून त्यांची पीडा, समजून त्यांची मनस्थिती..
स्त्रियांना दिले कायदेरूपी वरदान

बाबासाहेबांनी दाखवला मार्ग
स्त्रिया झाल्या त्यावर आरूढ
घेती झेप उंच आकाशी
कायद्याची बाजू त्यांच्या पाठीशी

जरी स्त्री असली यशोशिखर सर करत
समाज तील अजूनही मागे खेचत...
तिच्या अस्तित्वाचा चेंदामेंदा करत..
पायदळी तिला तुडवत

अजूनही सर्रास
चालती गर्भपात केंद्र
होती बलात्कार, निर्भया, हिंगणघाट, वर्धा चर्चेत
थांबवावे हे दारुण चित्र
समाज व्यवस्था करावी भक्कम

माझी एवढीच विनंती जाणून
बाबासाहेबांचे संविधान
पोहोचवावे जनमानसात
शहाणे करून सोडावे सकलजन

पायमल्ली न करावी कायद्यांची
संविधानाचा करावा सर्वांनी सन्मान
स्त्री हिताला द्यावे प्राधान्य
कविता संविधानाची
स्त्रियांच्या मुक्तीची....!

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ डिसेंबर २०२४


## विरोधी पक्षनेत्याशिवाय होणार महायुतीचे पहिले हिवाळी अधिवेशन




**नागपूर :** महायुतीचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र पडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली आहे. महायुतीने सत्ता स्थापनेचा प्रस्तावसुद्धा राज्यपालाकडे सादर केला आहे. सोबतच महायुतीच्या पहिल्या हिवाळी अधिवेशनाचीही तारीख ठरवण्यात आली आहे. १६ डिसेंबरपासून अधिवेशन घेण्यात येणार असून एक आठवड्याचे कामकाज सध्या निश्चित करण्यात आले आहे.

विधिमंडळ सचिवालायचे कर्मचारी १० डिसेंबरला नागपूरमध्ये दाखल होणार आहेत. १६ पासून अधिवेशनाला सुरुवात होणार असल्याचे त्याची तयारी सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी हिवाळी अधिवेशन नवे नाही. विरोधात असताना त्यांनी अनेक अधिवेशने गाजवली आहेत. सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडले आहे. पाच वर्षे मुख्यमंत्री असताना त्यांनी विरोधकांचा सामनाही केला आहे. हिवाळी अधिवेशनाकडे प्रामुख्याने विदर्भातील शेतकऱ्यांचे लक्ष लागून असते. शेतकऱ्यांपासून विविध संघटनांचे रोज मोर्चे धडकतात. आंदोलने केली जातात. हिवाळी अधिवेशनाच्या काळात गोवारी समाजावर लाठीहल्ला झाला होता. त्यावेळ काँग्रेस आघाडीचे सरकार कोसळले होते. आता देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पुन्हा सरकार आले आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनाकडून सर्व वैदर्भीयांच्या अपेक्ष उंचावल्या आहेत.

महायुतीचे आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेणार असल्याचे जाहीर केले होते. सोबतच शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्याचा निर्णयसुद्धा घेतला आहे. फडणवीस यांनी वैनगंगा-नळगंगा हा नदीजोड प्रकल्प जाहीर केला आहे. ८० हजार कोटींचा खर्च यासाठी अपेक्षित आहे. विदर्भाला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प या प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांनी सोडला आहे. हे बघता पहिल्या अधिवेशान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय घोषणा करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यात विरोधी पक्ष नेता होण्यासाठी आवश्यक ते संख्याबळ एकाही पक्षाकडे नसल्यामुळे राज्यात पाच वर्षे विरोधी पक्ष नेता हे पदच राहाणार नाही. आणि तीनही पक्ष मिळून सर्वांनी सर्वसंमतीने विरोधी पक्षनेता म्हणून एकाची निवड केली तरी तशी प्रथा नाही, अशी माहिती विधिमंडळाचे निवृत्त प्रधान सचिव अनंत कळसे यांनी दिली. अशी प्रथा असती तर लोकसभेत देखिल अशा प्रकारे विरोधी पक्षनेता निवडता आला असता. समजा तीनही पक्षांनी मिळून सर्वसंमतीने विरोधी पक्षनेता म्हणून एकाची निवड केली तरी त्याला मान्यता द्यायची की नाही याचे अधिकार विधानसभा अध्यक्षांना आहे. त्यांनी नाकारले तर त्याला आव्हान दिले जावू शकत नाही असे कळसे यांनी स्पष्ट केले.

## नेत्यांना भेटल्यावर मंत्रिपद मिळते हा गैरसमज : संजय शिरसाट



**मुंबई :** शिवसेनेचा आमदार जर भाजप नेत्यांना भेटत असेल, एनसीपीचा आमदार शिवसेनेच्या नेत्यांना भेटत असेल तर त्याची मंत्रिमंडळात वर्णी लागते असा कोणताही भाग नाही. ज्या- ज्या पक्षाचा नेता त्या- त्या पक्षातील कोणता आमदार मंत्री होईल, हे ठरवत असतो. हा त्यांचा स्वतंत्र अधिकार आहे. त्यांना इतरांच्या रेकमेंडेशनची गरज नाही. त्यामुळे मी त्यांना भेटल्यावर मंत्रीपद मिळते, असा गैरसमज करू नका, असा सल्ला शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी दिला आहे.

विधिमंडळाचे सात ते नऊ तारखेला विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. ११ किंवा १२ तारखेला मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे स्वतः देवेंद्र फडणवीस यांनी सुतवाच केले आहे. तयामुळे राज्यात लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचा दावा शिरसाट यांनी केला आहे. मात्र मंत्रिमंडळात कोणाचा समावेश असेल तर त्या पक्षातील नेते ठरवतील, असे देखील शिरसाट यांनी म्हटले आहे.

एकूण २३२ विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहे. त्यात राज्यात मंत्रीपदे कमी आहेत. त्यामुळे या सर्वांचा ताळमेळ बसवला लागेल. येथे सर्व पक्षाच्या नेत्यांना त्यांचे कौशल्य दाखवावे लागणार आहे. आणि त्या आधारित या नवीन मंत्रिमंडळाची निवड करावी लागणार असल्याचे शिरसाट यांनी म्हटले आहे.

नदी जोड प्रकल्प हा मराठवाड्यासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. महाराष्ट्राच्या इतर भागात अतिरिक्त पाऊस पडत आहे आणि ते पाणी समुद्राला मिळत आहे. इतकेच नाही तर पूर परिस्थिती निर्माण होते. मात्र जर नदीजोड प्रकल्प झाला तर बॅलन्स राखता येईल. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागाला हे पाणी मिळू शकते, असे देखील शिरसाट यांनी म्हटले आहे.

सरकारची भूमिका ही सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाण्याची आहे. मराठा समाज, ओबीसी समाज, दलित समाज, आदिवासी समाज या सर्व समाजाला सोबत घेऊन जाण्याची सरकारची मानसिकता आहे. कोणत्याही समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजावर अन्याय होऊ नये, हे एकनाथ शिंदे साहेबांनी या आधी देखील सांगितले होते. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय व्हायला नको, अशी भूमिका देखील त्यांनी घेतली होती. त्याचप्रमाणे आता नवीन सरकार देखील कोणत्याही समाजावर अन्याय होऊ देणार नसल्याचे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

## मनोज जरांगे मराठा आरक्षणासाठी पुन्हा मैदानात

**जालना :** महायुतीचे ५ डिसेंबर रोजी सरकार स्थापन झाले आहे. त्यांना आम्ही १ महिन्यांचा कालावधी देत आहोत, त्यांनी ५ जानेवारीपर्यत मराठा आरक्षण, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अन्यथा मराठा समाज पुन्हा संपूर्ण ताकदीने सरकीला परेशान करतील, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, 'वैचारिक मतभेद जरी असले तरी अभिनंदन करण्याची, शुभेच्छा देण्याची प्रथाच आहे. त्याप्रमाणे त्या तिघांचं खूप-खूप अभिनंदन. पण आता मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी सुरुवात करायची. नाटकबाजी बंद करायची असेही त्यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, सरकार स्थापन झाले आहे, जनतेचे प्रश्न मार्गी काढणे गरजेचे आहे.समाजात जी खदखद आहे, ती त्यांना दिसत नसेल पण इतकी भयंकर सुप्त लाट आहे, ते परेशान होतील. काल सरकार स्थापन झाल्यावर त्यांना तिघांना आम्ही शुभेच्छा दिल्या आहेत. आता त्यांनी गोरगरिबांचे प्रश्न मार्गी लावले पाहिजे. ५ जानेवारीपर्यत त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा. नसता हे मराठे तुफान ताकदीने आंदोलनात उभे राहून सरकारला परेशान करणार आहेत, सोडणार नाही. २००४ चा अध्यादेशामध्ये दुरुस्ती करायची, सगे-सोयरेची अंमलबजावणी करायची यासोबतच तिन्ही गॅझेट आणि लाखो पोरांवर झालेल्या केसेस मागे घ्याव्यात.

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, आमच्या ज्या ८ - ९ मागण्या पूर्वीच्या सरकारकडे आम्ही मागितल्या होत्या त्या यांनी मार्गी काढाव्या, तेव्हाही हेच सरकार होते. नसता पुन्हा मराठा समाजाच्या पुढे त्यांना जायचे आहे. गुर्मी, झाकी, अन् मस्तीत सरकारने जगू नये असे म्हणत सरकारला इशारा दिला आहे.


शाळा, महाविद्यालय, सामाजिक व राजकीय संघटना, समाजसेवी संस्था आणि इतर समाजोपयोगी कार्यक्रमाचे व्हिडीओ क्लीप किंवा कार्यक्रमांची बातमी तयार करून पाठविल्यास आम्ही आमच्या महाराष्ट्र जनशक्ती न्युज युट्युब चॅनलवर प्रसारित करू. तसेच कार्यक्रमाच्या बातम्या व फोटो आमच्या दैनिक महाराष्ट्र जनशक्ती ऑनलाईन वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करू त्याचबरोबर कविता, कथा, सामाजिक, वैचारिक लेख ही दैनिकात प्रसिद्ध करण्यात येतील. तरी आपण 7588005002 या व्हॉट्सअॅप नंबरवर कार्यक्रमाचे व्हिडीओज, बातम्या, कथा, कविता, लेख इ. पाठवावेत. संपादक - डॉ. हसन इनामदार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ डिसेंबर २०२४

## "साहेब आहे मी"



**कवी डॉ. बाळासाहेब लिहिणार**

साहेब झालास तू
सांग तुझे सामाजिक योगदान काय
सामाजिक सोड कौटुंबिक योगदान काय
फुले शाहू आंबेडकरी विचाराशी तुझी काय नाळ हाय.

ढुंगणावरील ठिगळ गेलं
काट्याकुट्यात फिरणही गेलं
भिकाऱ्यागत जगणही गेलं
बाबासाहेबाच्या चळवळीमुळं
हाती तूझ्या पुस्तक आलं

शिकला तू आणि सावरलाही
पण जगलास मात्र स्वत:साठी
बायको मुलं आणि तू याशिवाय
तुझं वागणं काय

राहणीमान पाहून तुझे
मिळाला समाज अन् नात्या गोत्यात सन्मान
सन्मान दिला तुला
पण तुझे दा्तृत्व काय

जगणे तुझे तोऱ्यात
वागणेही तुझे तोऱ्यात
सन्मान करनारे नाते
त्या नात्यालाच नाव ठेवत गेलास
घरी दारी गेलासच कोणाच्या
तर ख्याली खुशाली सोडून
तू तुझी अक्कलच पाजळत गेलास

बग तपासून स्वत:ला
इतिहास बग तुझा
खरं सांग तुझं काय होतं
मान सन्मान प्रतिष्ठा
सगळंच तर चळवळीन दिलं होतं

चळवळीणं वाढवलं तुला
लेकरासारखं जपलं तुला
चळवळीचा तुला सहारा होता
म्हणून तू मोठा झाला
बळ आलं तुझ्यात
अन् तू चळवळच म्हातारी झाली म्हणालास.

लोकांच्या सुखा दुखापासून
तू कायमचाच दूर.
सगे सोयरे तोंडी लावायला
लोंच्यासारखे ठेवलेस तू

साहेब आहे म्हणे मी
बग आतमध्ये डोकावून
तपासून घे स्वत:ला
असेलच थोडी फार
लाज लज्जा शरम
तर शरमेने मान नक्कीच खाली जाईल.
नाहीतर ती तशीच उभी राहील
नाहीतर ती तशीच उभी राहील

# वाचन कौशल्य जोपासल्यामुळे मनुष्य ज्ञानाने व अनुभवाने समृद्ध होतो - कवी बालाजी इंगळे





**मुरुम ता. उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकांनी सकाळी ८ वाजता ते रात्री ८ वाजेपर्यंत सतत बारा तास पुस्तक वाचन व परीक्षणाचे आयोजन ग्रंथालय विभागामार्फत अभ्यासिकेमध्ये करण्यात आले होते.

या उपक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक श्री बालाजी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलत असताना बालाजी इंगळेंनी वाचनाचे महत्त्व व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या जीवनात पुस्तकांना असलेले विशेष स्थान विद्यार्थ्यांना समजून सांगितले.

विद्यार्थ्यांनी परीक्षेपुरते वाचन व अभ्यास मर्यादित न ठेवता ही वाचन कौशल्य जोपासली तर मनुष्य ज्ञानाने व अनुभवाने समृद्ध होतो असे प्रतिपादन त्यांनी या प्रसंगी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. महापुरुषांच्या जयंती व स्मृतीदिनी त्यांच्या प्रतिमांना फक्त पुष्पहार अर्पण न करता त्यांचा विचार कृतीशील उपक्रमांच्या माध्यमातून रुजवणे ही खरी गरज आहे.

त्यांच्या विचाराचा वसा घेऊन तो प्रत्यक्षात आणणे हेच खऱ्या अर्थाने त्यांना केलेले अभिवादन होईल. असे प्रतिपादन त्यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, प्रबंधक श्री राजकुमार सोनवणे, प्रभारी प्राध्यापक डॉ. वसंत हिस्सल, ग्रंथपाल डॉ. बी. व्ही चालुक्य, सहाय्यक ग्रंथपाल श्री सतीश जगताप, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक, ग्रंथालयीन कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गिरीधर सोमवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन




**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक ६ डिसेंबर २०२४ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व होते, तसेच ते थोर समाजसुधारक म्हणून देखील ओळखले जातात. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजच्या पिढीलाही तितकेच गरजेचे आणि आदर्श वाटतात असे मत प्रतिपादित केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.